# BADRUDDIN TAYYABJI

# २.३ बद्रुद्दीन तय्यबजी

### प्रास्ताविक

आपल्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय कार्यामुळे बद्रुद्दीन तय्यबजी लोकांना परिचित आहेत. बद्रुद्दीन तय्यबजी वकील (पहिले भारतीय बॅरिस्टर), स्वातंत्र्य सेनानी व सामाजिक सुधारक होते. त्यांचे भारतीय सुधारणा चळवळीतील योगदान मोलाचे आहे.

बद्रुद्दीन तय्यबजी यांचा जन्म ८ ऑक्टोबर १८४४ रोजी मुंबई मध्ये मुस्लीम (सुलेमानी बोहरा) कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव अमिना व वडिलांचे नाव भाई मियान होते. त्यांच्या पत्नीचे नाव रहत उन नफ्स होते. त्यांचे पूर्वज काही शतकापूर्वी अरबस्तानातून येऊन कँबे येथे व्यापार करू लागले आणि नंतर तेथून मुंबईला येऊन स्थायिक झाले. दादा मखराच्या मदरशात त्यांना उर्दू आणि फारसीचे शिक्षण मिळाले. त्यानंतर मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बद्रुद्दीन यांना सहा भाऊ होते. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात विशेषत: मुस्लीम समाजात कमालीची अनास्था असतानाही त्यांचे वडील तय्यब अली भाईमिया यांनी सर्व भावंडांना शिक्षणासाठी युरोपात पाठविले. बद्रुद्दीन डोळ्यांच्या उपचारांसाठी फ्रान्सला व तेथून शिक्षणासाठी लंडनला दाखल झाले. न्यूबरी हाय पार्क कॉलेज व लंडन विद्यापीठात त्यांनी शिक्षण घेतले. दृष्टी कमी होऊ लागल्याने ते मुंबईस परतले पण पुन्हा मागे जाऊन त्यांनी मिडल् टेम्पलमधून (१८६७) आपले कायद्याचे शिक्षण पूर्ण केले. बद्रुद्दीन यांचे मोठे भाऊ कमरुद्दीन इंग्लंडमधील पहिले भारतीय सॉलिसिटर होते. बद्रुद्दीन यांनीही इंग्लंडमध्ये वकिली सुरु केली परंतु पुढे ते भारतात

परतले व त्यांनी मुंबईत आपले वकिली सुरु केली लवकरच निष्णांत वकील म्हणून प्रसिद्ध झाले. सर्व प्रकारचे खटले चालवत त्यांनी अल्पावधीत आपला जम बसविला. मुंबई बाहेरील खटलेही त्यांच्याकडे मोठ्या संख्येने येऊ लागले. मुंबई उच्च न्यायालयातील ते पहिले भारतीय बॅरिस्टर होते. इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर झालेले पहिले भारतीय, मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत वकिली करणारे पहिले भारतीय बॅरिस्टर, उच्च न्यायालयाचे पहिले बॅरिस्टर भारतीय न्यायाधीश, उच्च न्यायालयाचे पहिले मुस्लिम न्यायाधीश, त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून काम पाहिलेले पहिले भारतीय न्यायाधीश असे अनेक मान तय्यबजी यांच्याकडे जातात. वकील प्रमाणेच परखड, निर्भीड व चांगले न्यायधीश म्हणूनही त्यांनी मोठे नाव कमावले.

अल्पावधीतच बद्रुद्दीन सार्वजनिक जीवनात आले. त्यावेळी मुंबईच्या सार्वजिनक जीवनात फिरोजशाह मेहता, के टी तेलंग व बद्रुद्दीन हे तिघे 'द थ्री स्टार' म्हणून लोकप्रिय झाले होते. मुंबई महानगरपालिकेत ते दोन वेळा निवडून (१८७३ व १८७८) गेले. त्यांनी ही आले. मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले. मुंबई विधान परिषदेवरही त्यांची नियुक्ती झाली होती परंतु त्यांनी मध्येच प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजीनामा दिला. पाश्चात्य संपर्क व प्रभावातून बद्रुद्दीन यांना भारतीय समाजातील दोषांची तीव्रतेने जाणीव झाली. त्यातून त्यांनी सार्वजनिक जीवनात समाज कल्याण व उन्नतीसाठी विविध स्तरावर काम केले. या कामाचा परिचय पुढीलप्रमाणे ...

**विविध संघटनाच्या माध्यमातून कार्य**

मुस्लिमांचे कल्याण व उन्नतीसाठी बद्रुद्दीन यांनी मुंबईत अंजुमन ए इस्लाम संघटनेची स्थापना (१८७६) केली. आपल्या भावाच्या (कमरुद्दीन तय्यबजी) मदतीने त्यांनी स्थापन केलेल्या

'सरमिया-ए-जमात-ए-सुलेमानी' या संस्थेचे सचिव व पुढे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. पुढे भारतीयांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी बद्रुद्दीन यांनी फिरोजशाह मेहता, के टी तेलंग यांच्यासह बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनची स्थापना केली. त्यांनी या संघटनेचे कार्य विस्तारित करण्यासाठी प्रयत्न केले. पुढे १८८५ मध्ये अखिल भारतीय राष्ट्रीय सभा स्थापन झाली त्या मुंबई अधिवेशनाचे यजमानपद बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनने भूषविले. राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधीमध्ये बद्रुद्दीन व त्यांच्या मोठ्या भावाचाही समावेश होता. मुस्लिमांना मुख्य प्रवाहात आणणे व सामाजिक ऐक्यासाठी त्यांनी इस्लाम क्लब आणि इस्लाम जिमखाना यांची स्थापना केली होती.

**स्वातंत्र्य चळवळीत योगदान**

बद्रुद्दीन यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी संघटना राष्ट्रीय सभेच्या स्थापना व कार्यात बद्रुद्दीन यांचे योगदान फार मोठे आहे. बद्रुद्दीन व त्यांचे भाऊ कमरुद्दीन यांनी राष्ट्रीय सभेच्या कामास वाहून घेतले होते. सुरुवातीच्या काळातील महत्वाच्या नेत्यांमध्ये त्यांचा समावेश होतो. बद्रुद्दीन हे महत्त्वाचे मवाळ नेते होते. त्यांच्या न्यायालयात राष्ट्रीय सभेचा कधीही अवमानकारक संदर्भ दिला गेला नाही. १८८७ (मद्रास अधिवेशन) मध्ये ते राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष बनले. कॉँग्रेसचे पहिले मुस्लिम अध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला.

**उत्क्रांतीवादी सुधारक**

बद्रुद्दीन सामाजिक धार्मिक व सर्वांगीण सुधारणांचे पुरस्कर्ते होते. पण या सुधारणा त्यांना हव्या असल्या तरी त्या  घाईगडबडीत लागू करू नये असे त्यांचे मत होते. काही लोक वेगाने क्रांतिकारी सुधारणांसाठी आग्रही होते. परंतु बद्रुद्दीन तय्यबजी सावधानतेने सुधारणा करण्याचे पुरस्कर्ते होते. त्यांना सुधारणा  टप्प्याटप्प्याने करावयाच्या होत्या. कारण त्यांना सुधारणासाठी

आपल्या समाजालाही तयार करायचे होते. अचानक व हिंसक पद्धतीने तिरस्कार वाढून सुधारणांविषयी अनास्था निर्माण होण्याची शक्यता होती. जबरदस्तीने सुधारणा चळवळ पुढे जाण्याऐवजी बदनाम होईल व समाजात फुट ही पडेल म्हणून सावधगिरीने सुधारणा कराव्या असे त्यांचे मत होते.

**विचार प्रसार व प्रेरणा**

बद्रुद्दीन उत्तम वक्ता होते. त्यांनी विविध सामाजिक राजकीय प्रश्नांवर भाषणे देऊन लोकांमध्ये जागृती घडवून आणली. आपली भाषणातून ते विविध प्रकारच्या सुधारणांचा पुरस्कार करत. आयात शुल्क आणि नागरी सेवा सुधारणांवर त्यांनी भाषणे दिली त्याच बरोबर भारतीयांच्या अपेक्षा आकांक्षा त्यांनी इंग्रजांपर्यंत पोहोचविण्याचे मोलाचे काम केले.

**धार्मिक परंपरापेक्षा सुधारणांना अग्रक्रम**

बद्रुद्दीन तय्यबजी सुधारणांचे पुरस्कर्ते होते. सुधारणांना प्रोत्साहन देताना व त्या सुधारणा अमलात आणताना अनेकदा त्यांच्या समुदायाच्या धार्मिक भावना आड आल्या. धर्म प्रमुखांचा विरोधही झाला परंतु त्यांनी सुधारणांना अग्रक्रम दिला. मूळ धर्माचे स्वरूप मांडले. विवेकाने विरोध करणाऱ्यांना त्यांनी सुधारणांचे स्वरूप आवश्यकता व योग्यता पटवून दिली.

**सामाजिक सलोखा व एकोपा**

बद्रुद्दीन तय्यबजी यांनी कायम सामाजिक सलोख्यासाठी प्रयत्न केले व पुरस्कार केला. त्यांनी जमातवादी विचारांना विरोध केला. त्यांनी विभाजनवादी धोरणाचा पुरस्कार करावा यासाठी त्यांना अनेक प्रलोभने देऊनही त्यांनी हिंदू मुस्लीम ऐक्याचा पुरस्कार केला. प्रामुख्याने व्दिराष्ट्रवाद सिद्धांताला विरोध करण्याची जबाबदारीही त्यांनी पार पडली. मागासलेल्या

मुस्लिमांच्या विकासासाठीही व्दिराष्ट्रवाद त्यांनी अडथळा असल्याचे मानले. मुस्लिमांमध्ये धर्मनिरपेक्ष राजकीय जाणीव निर्माण करणारे पहिले नेते म्हणून बद्रुद्दीन तय्यबजी यांचा उल्लेख करता येईल. थोडक्यात मुस्लिमांना मुख्य प्रवाहात आणून दोन समाजात एकोपा निर्माण करण्यात बद्रुद्दीन तय्यबजी यांनी मोलाचे योगदान दिले. एखाद्या राष्ट्राने किंवा लोकांनी त्यांच्या धार्मिक कल्पना किंवा सवयींमधील फरकांमुळे दुसऱ्या राष्ट्राचा तिरस्कार केला किंवा त्यांचा द्वेष केला, तर धर्म प्रेम आणि बंधुत्वाऐवजी लोकांमध्ये व्देष आणि शत्रुत्त्व निर्माण होऊन मूळ धर्म विचारांना धक्का बसेल. खरेतर धर्म हा केवळ सद्गुणांची प्रशिक्षण देणारी शाळा आहे असे त्यांचे मत होते.

**शिक्षण प्रसार**

समाजाच्या उन्नतीचे सर्वात महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय हे बद्रुद्दीन व त्यांच्या कुटुंबाने चांगलेच ओळखले होते. त्यामुळे त्यांनी मागासलेल्या समाजाच्या विकासासाठी शिक्षण प्रसारासाठी प्रयत्न केले. लोक अज्ञानी असतील तर चांगली शासन पद्धतीही लोककल्याण साधू शकत नाही असे त्यांचे मत होते. त्यामुळे शिक्षण प्रसारासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. १८७६ मध्ये कमरुद्दीन या भावाच्या मदतीने त्यांनी मुसलमानांच्या शिक्षणाकरिता अंजुमन-ई-इस्लाम या शिक्षण संस्थेची स्थापना केली. मुसलमान समाजाचा मागासलेपणा घालविण्यासाठी त्यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांत महत्त्वाचे कार्य केले. या संस्थेने सुरुवातीस मुंबईतील गोकुळदास तेजपाल शाळेत अंगलो हिंदी भाषेचा वर्ग सुरू केला. पुढे लवकरच त्यांनी निधी गोळा करण्यासाठी बैठक बोलविण्यात पुढाकार घेतला. आणि २० सप्टेंबर १८८० रोजी स्वतंत्र शाळेचे वर्ग सुरू केले. आपल्या मुलांना त्यांनी याच शाळेत शिकविले. सरकारनेही या शाळेला वार्षिक अनुदान देऊ केले. १८८२ च्या शैक्षणिक आयोगासमोर त्यांनी साक्ष देऊन शैक्षणिक सुधारणांची मागणी केली.

**स्त्री शिक्षणाचा प्रसार**

बद्रुद्दीन तय्यबजी यांनी स्त्रियांच्या विकासासाठी शिक्षणाचा पुरस्कार केला. १८७६ मध्ये मुंबईत माझगाव येथे मुलींची शाळा सुरु झाली या शाळेत बद्रुद्दीन यांनी त्यांच्या तीन मुलीना दाखल करून आदर्श निर्माण केला. त्यांनी त्यांच्या सर्व मुलींना शिक्षण दिले. या मुलींचे शिक्षण वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत सुरु होते. शिवाय त्यातील दोन मुलींना शिक्षणासाठी १९०४ मध्ये इंग्लंडमधील हसलेमेरे येथील बोर्डिंग स्कूलमध्ये पाठविले. जग जाणून घेण्याची व प्रलोभनापासून सावध राहण्याची आणि स्वत:चे रक्षण करण्याची क्षमता स्त्रियांना शिक्षणामुळे मिळते असा त्यांचा विश्वास होता.

**पडदा / गोषा पद्धतीस विरोध**

पडदा गोषा ही एक जुनी गंभीर व असह्य अनिष्ट प्रथा होती. या गुदमरून टाकणाऱ्या या प्रथेस स्त्री स्वातंत्र्य मानणाऱ्या बद्रुद्दीन यांनी विरोध केला. बद्रुद्दीन यांनी कुरणच्या आदेशात कुठेही पडदा पद्धतीस थारा असे सांगत या अनिष्ट प्रथे विरोधात प्रचार केला. आयुष्यभर पडदा प्रथेविरुद्ध मोहीम राबविली. त्यांनी हे केवळ लोकांना सांगितले असे नाही तर स्वत:च्या घरातही त्यांनी पडदा पद्धती बंद केली. या अनिष्ट प्रथेचा त्याग करणारे पहिले कुटुंब तय्यबजी यांचे होते.

**धार्मिक व संसारिक बाबी वेगळ्या**

बद्रुद्दीन तय्यबजी यांच्या मते संसारिक, आर्थिक प्रश्न हे धार्मिक प्रश्नापासून वेगळे आहेत. धार्मिक प्रमुखांनीही संसारिक व आर्थिक बाबींपासून स्वत:ला दूर ठेवले पाहिजे. कारण संसारिक बाबींमध्ये अनावश्यक पद्धतीने धार्मिक अधिकार आल्यास त्यातून भ्रष्ट प्रथा निर्माण होतात. म्हणून बद्रुद्दीन तय्यबजी दोन्ही गोष्टी वेगळ्या ठेवण्याचा पुरस्कार करतात.

**संमती वयाचे विधेयक (१८९१)**

संमती वयाचे विधेयक ज्यावेळी पारित होण्यासाठी चर्चा सुरु झाली त्यावेळी तत्कालीन हिंदू व मुस्लीम दोन्ही समाजाचा या विधेयकास विरोध होता. तरीही हा विरोध पत्करून १८९१ मध्ये बद्रुद्दीन यांनी संमती वयाचे विधेयकास पाठींबा दिला व लोकांनाही हे कसे व का योग्य आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला.

**वेशभूषा विषयक विचार**

बद्रुद्दीन तय्यबजी यांनी पोशाखाचा धर्माशी काहीही संबंध असे मत मांडले. भारतीय वेशभूषा त्यांनी स्वीकारली होती. अगदी न्यायालयात हजर राहतानाही त्यांनी भारतीय कपडे आणि पगडी वापरण्यास प्राधान्य दिले. अर्थात अतिरेकी स्वरूपाचा आग्रह त्यांनी धरला नव्हता तर कपडे वापरताना सोय महत्त्वाची असे त्यांचे मत होते. उन्हापासून संरक्षण करण्यास इंग्रजी टोपी उपयुक्त असून आवश्यकतेनुसार ती वापरण्याचा वा तसे कपडे वापरण्याचा त्यांनी पुरस्कार केला. युरोपियन असलेली गोष्ट केवळ युरोपियन असल्याने स्वीकारणे ही गुलामगिरीची मानसिकता असून ती सोयीस्कर असल्यास मात्र स्वीकारणाचा त्यांनी पुरस्कार केला.

**आधुनिकता, नवे शोध, व्यायाम यांचा पुरस्कार**

माणसाचे ज्ञान सतत वाढत रहावे व नव्या ज्ञानाचा स्वीकारही केला जावा असे त्यांचे मत होते. युरोपात वैद्यकशास्त्रात खूप नवे शोध लागले असून त्यांचा गरजेनुरूप उपयोग टाळणे मूर्खपणाचे व दुर्दैवी ठरेल असे त्यांचे मत होते. केवळ जुन्या हकीम वैद्यावर अवलंबून न राहता या नव्या चिकित्सा व उपचार पद्धतीचाही स्वीकार झाला पाहिजे. व्यायाम व खेळामुळे शारीरिक -

मानसिक विकास होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये या गोष्टी बिंबविल्या पाहिजे त्याकडे दुर्लक्ष करू नये. म्हणूनच त्यांनी इस्लाम जिमखान्याच्या कामात खूप रस घेतला होता.

**आधुनिक मुंबईची पायाभरणी**

मुंबई च्या विकासात व जडणघडणीत अनेक सुधारक नेत्यांचे योगदान मोलाचे आहे. या शहराचे सार्वजनिक जीवन उंचावण्यात आणि मुंबईला भारतीय राजकारणाचे केंद्र बनविण्यात न्या.तय्यबजी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**स्वभाषा व स्व इतिहासाचे महत्त्व**

बद्रुद्दीन तय्यबजी यांनी भारतीय भाषेला महत्त्व दिले. विभाजनवादी विचारातून इतर भाषांचा पुरस्कार करणाऱ्या व वांशिक श्रेष्ठतेच्या अवास्तव कल्पनेतून इतर भाषा लादण्यास विरोध केला. माणसाच्या अंतरंगातील विचारांची कल्पना त्याच्या मातृभाषेतच झाली होती आणि म्हणूनच त्याचा आदर आणि संवर्धन करणे योग्य होते. तसेच स्वत:चे साहित्य आणि इतिहास जाणून घेणे हे त्यांनी आपले कर्तव्य आहे असे सांगितले.

**मानवतावादी काम**

१८७८ मध्ये पडलेल्या दुष्काळात तसेच १८९८ मधील प्लेगच्या साथीच्या वेळी त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले व जनतेस सर्वतोपरी मदत दिली.

**समारोप**

बद्रुद्दीन तय्यबजी हे उदारमतवादी आणि राष्ट्रवादी होते. त्यांनी राजकीय स्वातंत्र्यासाठी कार्य करतानाच सामाजिक व धार्मिक सुधारणांचाही पुरस्कार केला. याबरोबरच त्यांच्या

कार्यक्षमतेमुळे त्यांना अनेक पदांवर काम करण्याची संधी मिळाली. उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून काम केलेले बद्रुद्दीन तय्यबजी पहिले न्यायधीश होते. ऑगस्ट १९०६ मध्ये ते इंग्लंडला असतना त्यांना हि संधी पुन्हा देऊ करण्यात आली त्यामुळे ते मुंबईस परत निघाले होते परंतु १९ ऑगस्ट १९०६ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे अचानक निधन झाले.

**प्रश्न**

बद्रुद्दीन तय्यबजी यांचे कार्य लिहा.

बद्रुद्दीन तय्यबजी यांच्या कामगिरीचा आढावा घ्या.

बद्रुद्दीन तय्यबजी यांचे सुधारणा चळवळीतील योगदान स्पष्ट करा.